# गणेशोत्सव -२०२० मार्गदर्शक सूचना

दिनांक २२.०८.२०२० ते दिनांक ०१.०९.२०१० दरम्यान संपुर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. गणेशोत्सवानिमित्त व सार्वजनिक ठिकाणी श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना, पुजा करण्यात येते. पुर्वी गणेशोत्सवा दरम्यान सार्वजनिक मंडळातर्फे विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात होते परंतु सध्या सदरहु गणेशोत्सव शांततेत पार पाडण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

२. सध्या जगभरात कोरोना विषाणूची साथ फैलावली असून देशात व राज्यात देखील कोरोना बाधितांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. या रोगास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, गृहविभाग यांचे परिपत्रक क्रमांक आरएलपी - ०६२०/ प्र.क्र. ९०/ विशा १ ब, दिनांक ११.०७.२०२० निर्गमित करण्यात आले आहे. तसेच भविष्यात केंद्र व राज्य शासनाच्या वतीने वेळोवेळी परिस्थितीनुरूप जे आदेश निर्गमित होतील त्याप्रमाणे गणेशोत्सवा दरम्यान योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत व त्याचे पालन होणे अत्यावश्यक आहे.

३. <u>सार्वजनिक गणेशोत्सव - २०२० करीता मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे :-</u>

३.१ सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळांनी महापालिका / स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

३.२ श्री गणेशाची मुर्ती सार्वजनिक मंडळाकरिता ४ फूट व घरगुती गणपती २ फुटांच्या मर्यादेत असावी.

३.३ पारंपारिक गणेशमुर्ती ऐवजी घरातील धातू/ संगमरवर आदी मुर्तींचे पूजन करावे.

३.४ गणेशमुर्ती शाडूची पर्यावरण पूरक असल्यास त्याचे विर्सजन शक्यतो घरच्या घरीच करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास नजिकच्या कृत्रिम विसर्जनस्थळी गणेशमुर्तींचे विसर्जन करावे.

३.५ उत्सवाकरिता वर्गणी/ देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा. जाहिरातींच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही हे पहावे. तसेच आरोग्यविषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास विशेष पसंती देण्यात यावी.

३.६ सार्वजनिक गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपाबाबत न्यायालयाचे आदेश तसेच स्थानिक प्रशासनाचे मंडपाबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत असे मर्यादित स्वरूपाचे मंडप उभारण्यात यावेत. सजावट करतांना त्यात भपकेबाजी नसावी.

३.७ आरती, भजन, किर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही तसेच ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतूदींचे पालन करण्यात यावे.

३.८ सांस्कृतिक कार्यक्रमाऐवजी आरोग्य विषयक उपक्रम/ शिबीरे उदा. रक्तदान आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया डेंग्यू, इत्यादी आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी.

३.९ श्रीगणेशाचे दर्शनाची सुविधा ऑनलाईन केबल नेटवर्क, वेबसाईट व फेसबुक इत्यादीद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात यावेत.

३.१० गणपती मंडपामध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष येवून दर्शन घेवू इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शारिरीक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनिटायझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

३.११ श्रींच्या आगमन व विसर्जन मिरवणूका काढण्यात येवू नयेत. विसर्जनाच्या पारंपारिक पध्दतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करून विसर्जनस्थळी कमीत कमी वेळ थांबावे.

३.१२ लहान मुले आणि वरिष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळी जाणे टाळावे.

३.१३ संपूर्ण चाळीतील / इमारतीतील सर्व घरगुती गणेशमुर्ती विसर्जनासाठी एकत्रितरित्या काढण्यात येवू नयेत.

३.१४ महापालिका, विविध मंडळे, गृहनिर्माण संस्था, लोकप्रतिनिधी, स्वंयसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने कृत्रीम तलावांची निर्मिती करण्यात यावी.

३.१५ कोविड-१९ या विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच सण सुरु होण्यापूर्वी किंवा सणा दरम्यान काही सुचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील पालन करणे आवश्यक आहे.

४. यावर्षी दि.२२.०८.२०२० ते ०१.०९.२०२० या कालावधी दरम्यान साजरा होणारा गणेशोत्सवातील गणेश मुर्तीचे वर्षानुवर्षे नियमित चालत आलेल्या हिंदू रितीरिवाजानुसार खालील प्रमाणे विसर्जन होणार आहे. यावेळी शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे धोरण अवलंबिणे तसेच सामाजिक अंतर व स्वच्छतेचे नियम पाळणे अत्यंत आवश्यक आहे.

४.१ शनिवार, दिनांक २२.०८.२०२० गणेश चतुर्थी (श्री गणेशाची प्रतिष्ठापना), रविवार, दिनांक २३.०८.२०२० (दिड दिवसांच्या गणपतीचे विसर्जन), मंगळवार, दिनांक २५.०८.२०२० (गौरी आगमन), बुधवार, दिनांक २६.०८.२०२० (पाच दिवसाचे गणपतींचे विसर्जन), शुक्रवार, दिनांक २७.०८.२०२० (सातवा दिवस गणपतींचे विसर्जन), मंगळवार, दिनांक ०१.०९.२०२० (अनंत चतुर्दशी, ११ दिवसांच्या गणपतींचे विसर्जन).